| MHPU120002882020 | **नियमित दिवाणी दावा क्र. ४६/२०२०**<br>**आदेश निशाणी क्रमांक १३६**<br>**( श्रीमती सुभद्राबाई उर्फ शकुंतला शिवाजी तरस वि. अमर किरण भालघरे व इतर )** |
|---|---|

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १२ शशिकला वसंत उमाप यांचे वारस अभिलेखावर न घेण्याबाबत मुभा मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा हा ठराव, वाटप व निरंतर मनाई हुकुमाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१२ शशिकला वसंत उमाप यांचे दि.१३.१०.२०२५ रोजी निधन झालेले आहे. परंतु सदर मयत प्रतिवादीच्या विरोधात यापूर्वीच एकतर्फा आदेश पारित करण्यात आलेला आहे. सदरचा आदेश आजतागायत कायम आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींना सामील करणे कायद्याने आवश्यक नाही. सबब, सदर मुभा मिळण्याकरीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३, ६, ७अ ते ७क यांनी त्यांचे म्हणणे नि.३८ वर दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रस्तुतचा दावा हा ठराव, मनाई हुकुमाकरीता व वाटपाकरीता दाखल केला आहे. सबब, सर्व तथाकथित वारसांना दाव्यात सामील करणे कायद्याने आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१२ यांच्या वारसांना शोधण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. त्याबाबत

अर्जामध्ये कोणताही उल्लेख नाही. सबब, वादी हे मुभा मिळण्यास पात्र नाहीत. त्याचप्रमाणे वादी मागत असलेली मुभा दिल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत होणार आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. प्रतिवादी क्र.१७ ते २० यांनी त्यांचे म्हणणे नि.४२ वर दाखल करुन अर्जास विरोध केले आहे. त्यांच्या कथनानुसार वादीची मागणी बेकायदेशीर आहे. तसेच प्रस्तुत अर्जास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४अ ची बाधा येत आहे. त्याचप्रमाणे मयताच्या वारसांना दाव्यात पक्षकार न केल्यास दाव्यास आवश्यक पक्षकारांची बाधा येवू शकते. त्याचप्रमाणे सर्व पक्षकारांना दाव्यात समाविष्ट न केल्यास वाटप हे न्याय पध्दतीने होणार नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

५. वादी व प्रतिवादींच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनांशी सुसंगत असा युक्तीवाद केलेला आहे. वादीने त्याच्या युक्तीवादाच्या पुष्टयर्थ खालील न्यायनिर्णयांवर त्यांची भिस्त ठेवलेली आहे.

*१.मो.एस.इमाम वि. रायभारत कुमार व इतर (ए.आय.आर.२००० पटना ३२१)*

*२.झैरुल इस्लाम वि.मो.उस्मान व इतर ((२००३) १ सुप्रीम कोर्ट केसेस ४७६)*

*३.रिलायन्स कन्सलटन्सी सर्विसेस वि.मेट्रोपोलीटन इनवेस्टमेंट व इतर (२००७(३) एम .एच. एल .जे. ५४६)*

६. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ (४) अन्वये दाखल केलेला आहे. सदर नियमात सांगितल्याप्रमाणे न्यायालयास प्रतिवादीने कैफियत दाखल केली नसल्यास अथवा समन्स मिळाल्यानंतर न्यायालयात हजर राहून त्याचा बचाव मांडला नसल्यास त्याचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर न घेण्याची परवानगी देता येईल. सदर परवानगी दिल्यानंतर न्यायालयास न्यायनिर्णय घोषित करण्याचा देखील अधिकार आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने झैरुल (उपरोक्त) न्यायनिर्णयामध्ये वादीने कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर न घेण्याबाबत न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे म्हटलेले आहे. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिलायन्स प्रकरणात सदरची तरतूद ही विवेक अधिकाराची तरतूद असल्याने तिचा न्याय्य वापर केला पाहिजे असे म्हटलेले आहे. त्याचप्रमाणे मा. पटना उच्च न्यायालयाने मो. इमाम प्रकरणात सदरचा अर्ज हा कोणत्याही टप्यावर न्यायनिर्णय घोषीत करण्यापूर्वी दाखल करता येईल असे म्हटलेले आहे.

७. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणात दि.१९.०४.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१२ यांचे विरोधात एकतर्फा आदेश पारित करण्यात आल्याचे दिसून येते. सदरचा आदेश रद्दबातल करण्याकरीता प्रतिवादी क्र.१२ यांनी त्यांच्या हयातीत कोणतीही पावले उचलली नाहीत. सबब, सदरचा आदेश अद्याप कायम आहे. मा. मुंबई उच्च न्यायलयाने म्हटल्याप्रमाणे कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यात समाविष्ट न करण्याची मुभा देण्याची तरतूद हा न्यायलयाचा विवेक अधिकार आहे. कायद्यातील स्थापित

L

सिध्दांतानुसार विवेक अधिकार हा न्याय दृष्टीकोनातून वापरला पाहिजे. प्रस्तुत दावा हा वादी यांनी वाटपाकरीता, ठरावाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वाटपाच्या दाव्यात सामान्यतः सर्व आवश्यक पक्षकारांना सामील करण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे वाटपाच्या दाव्यात वादी व प्रतिवादी यांचे हक्क व हितसंबंध सामान्यतः एकसारखेच असतात. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचे हक्क व हितसंबंध दावा मिळकतीत समाविष्ट असतात. आधी म्हटल्याप्रमाणे प्रस्तुत दावा देखील वाटपाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१२ व त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी उपलब्ध असल्यास त्यांचे देखील दावा मिळकतीत हक्क व हितसंबंध आहेत. त्याचप्रमाणे हिंदू वारसा कायद्याप्रमाणे वारसाचा एकत्र कुटुंबाच्या मिळकतीत जन्मजात हिस्सा आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१२ यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या देखील कायदेशीर प्रतिनिधींचा दावा मिळकतीत हिस्सा व अधिकार आहे. सबब, त्यांचा बचाव मांडण्याची संधी त्यांना देणे आवश्यक वाटते.

८. मा. सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणात न्यायनिर्णयाची अंमलबजावणी करताना होणारा विलंब टाळण्याकरीता दावा मिळकतीत हक्क व हितसंबंध असलेल्या सर्व पक्षकारांना दाव्यात समाविष्ट करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १० प्रमाणे न्यायालयास चौकशी करण्याचे अधिकार देखील प्रदान करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणात दाव्याचे स्वरुप विचारात घेता मयत प्रतिवादी क्र.१२ यांच्या मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर

प्रतिनिधींचा दावा मिळकतीत हितसंबंध आहे. सबब, पुढील गुंतागुंत टाळण्याकरीता त्यांना दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब, सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आ दे श –**

वादीचा अर्ज (निशाणी क्रमांक १३६) नामंजुर करण्यात येत आहे.

ठिकाण – भोर

दिनांक – २४.०३.२०२६

( एस.डी.शिरसाट )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
भोर.